# २. नाते

जन्माबरोबर बरीच नातीसुद्धा जन्म घेतात. काही नाती काळाच्या ओघात टिकत नाहीत तर काही नातेसंबंध जास्त बळकट होतात. आज हे सर्व सांगण्याचे प्रयोजन म्हणजे रोज सकाळी फिरायला गेल्यानंतर दिसणारे दृष्य.

सकाळी रोज एक वयोवृद्ध जोडपे व त्यामधून चालणारा रस्त्यावरचा गावठी कुत्रा . परंतु आज सकाळी कुत्रा नव्हता. थोडे अंतर चालल्यानंतर कुठून तरी अंधारातून धावत तो तपकिरी रंगाचा गावठी कुत्रा आला व त्या दोघांच्या मधून जाऊ लागला. त्या गृहस्थाच्या हातात एक काठी असते व ती काठी त्या कुत्र्याच्या पाठीवर शाबासकीचा हात ठेवावा तशी ठेवलेली असते.

माझ्या चालण्याच्या वेगामुळे मी पुढे निघून गेलो परंतु मन मात्र तेच दृष्य बघत होते व मनात विचारांची गर्दी वाढू लागली.

त्या कुत्र्यांचे व त्यांचे नेमके काय नाते असेल. गेल्या जन्मी तो त्यांच्या घरी पाळलेला असेल का? त्यांचा तो मानसपुत्र असेल का?
मला हे सर्व सुचवण्याचे कारम की मी सुद्धा जवळजवळ १६ वर्ष एक लहान पोमेरीयन कुत्री पाळली होती.
मग विचार आला कि काही नाती का विसरली जातात व काही नाती का वृद्धिंगत होतात.

नातेसंबंध हा एकंदरच गुंतागुंतीचा विषय आहे. माझ्यामते असुरक्षिततेच्या भावनेतून माणसे नाती जोडतात व त्याला खतपाणी घालतात. ज्याच्यावर प्रेमाचा वर्षाव होतो त्याला अर्थातच हा मनातला अंतस्थ हेतु माहीत नसतो. पुढे काळाच्या ओघात जेव्हा अपेक्षित प्रेम मिळत नाही तेव्हा माणूस खचतो.

तरूणपणी करारी असणारा माणूस म्हातारपणी कोकरू होतो. संध्याछाया त्याला भिववतात. अशावेळी तो आपले गत आयुष्य आठवत बसतो व कोणा कडून मदतीची अपेक्षा ठेवता येईल ह्याची जुळवणी करत बसतो.

माणूस हा सामाजिक प्राणी आहे. शेवटी प्रत्येकाला कोणाची तरी मदत लागते. मग मदत देणा-यांचे नाते काहीही असले तरी.
म्हणूनच माणसाने पैशाच्या संग्रहाबरोबर माणसे जोडावीत. शेवटी ही माणसे व नातीच त्याला सुरक्षिततेची भावना देताात.
माणसे जोडावयाचा अभ्यास लहानपणापासून करावयाचा असतो परंतु आजकालच्या क्लासच्या जमान्यात लोकसंग्रहाचा क्लास करावा लागेल का?